महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

सेवानिवृत्त उपअभियंता (स्थापत्य) यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्याकरिता नामिकासूची (Panel) तयार करण्याबाबत.

म्हाडाच्या अखत्यारितील प्रादेशिक मंडळांच्या चालू तथा नियोजित प्रकल्पांकरीता तसेच मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या पुनर्विकास प्रकल्पांसाठी मनुष्यबळाची आवश्यकता व मागणीनुसार सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे निर्णय क्र.सीबीई/१५२५/प्र. क्र.३७/आस्थामं (का.१३), दि. १०/०६/२०२५ च्या अनुषंगाने म्हाडा तसेच शासनाच्या सेवेतुन उपअभियंता (स्थापत्य) संवर्गातुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांची सेवा एका वर्षासाठी करार पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात घ्यावयाच्या आहेत. त्याकरिता उपअभियंता (स्थापत्य) पदावर काम केल्याचा अनुभव असलेल्या पात्र सेवानिवृत्त अधिकारी यांची नामिकासूची (Panel) तयार करून सदर नामिकासूचीतील पात्र उमेदवारांमधून करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

अ.क्र.	पदनाम	पदसंख्या
१)	सेवानिवृत्त उपअभियंता (स्थापत्य)	२८

❖ करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता सर्वसाधारण अटी व शर्ती:-

१) करार पध्दतीने नियुक्ती करावयाचे सेवानिवृत्त अधिकारी हे वयाच्या ६५ वर्षांपर्यंतच कार्यरत राहू शकतील.

२) सदरच्या कामाकरिता करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वर्षासाठी असेल. परंतु नियुक्तीचे आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नूतनीकरण करण्यात येईल. मात्र, एकूण कालावधी तीन वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

३) स्थापत्यविषयक कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव असावा.

४) करार पध्दतीने नियुक्ती करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

५) करार पध्दतीने नियुक्ती करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांना देय मासिक पारिश्रमिक व भत्ते हे सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सीबीई/१५२५/प्र.क्र.३७/ आस्थामं (का.१३), दि. १०/०६/२०२५ मधील तरतूदींनूसार निश्चित करण्यात येतील.

६) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सीबीई/१५२५/प्र. क्र.३७/आस्थामं (का.१३), दि. १०/०६/२०२५ मधील सर्व अटी व शर्ती लागू असतील.

त्याअनुषंगाने खालील विहित नमुन्यामध्ये **दि. ०१/१०/२०२६ ते १५/१०/२०२६** या कालावधीमध्ये अर्ज मागविण्यात येत आहे.

अर्जाचा नमुना

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) येथे विवक्षित सेवा/कामासाठी पात्र सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्याबाबत.

			अर्जदाराचे छायाचित्र
१)	ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे ते पदनांम		
२)	अर्जदाराचे संपूर्ण नांव		
३)	अर्जदाराचा पत्ता		
४)	भ्रमणध्वनी क्र.		
५)	ई-मेल आयडी.		
६)	जन्म दिनांक व वय		
७)	शिक्षण		
८)	सेवेचा तपशील/नियोक्त्याचे सेवा-प्रमाणपत्र		
९)	सेवानिवृत्तीचा दिनांक		
१०)	इतर माहिती		

उपरोक्त पदावर सेवा करार पध्दतीने घेण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सीबीई/१५२५/प्र. क्र.३७/आस्थामं (का.१३), दि. १०/०६/२०२५ मधील अटी व शर्ती मला मान्य आहेत. सदर अटी व शर्तीमध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण आवश्यकतेनुसार बदल केल्यास, त्याचप्रमाणे वेळोवेळी निश्चित करण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असतील.

ठिकाण:-

दिनांक:- अर्जदाराचे नांव व स्वाक्षरी

वरील नमुन्यामध्ये इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी यांनी आपले विनंती अर्ज शैक्षणिक अर्हता, सेवा अनुभव प्रमाणपत्र व इतर माहिती पृष्ठयर्थ आवश्यक कागदपत्रे विहित कालावधीमध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, सचिव/ प्रा. यांचे कार्यालय कक्ष क्र. ५२३, चौथा मजला, गृहनिर्माण भवन , कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ या कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये प्रत्यक्ष जमा करावे अथवा adm.off.mhada@gmail.com या ई-मेलवर पाठविण्यात यावेत.

स्वाक्षरीत/-
प्रशासकीय अधिकारी -१
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.